५७


ISSN-2249-3034
UGC Care Listed Journal

वर्ष १५ वे / अंक १ /
जानेवारी–फेब्रुवारी–मार्च –२०२१

# अक्षरधारा

॥ शरच्चंद्र मुक्तिबोध जन्मशताब्दी विशेषांक ॥





# मुक्तिबोधांचे नवकाव्यविषयक चिंतन

डॉ. पुरुषोत्तम माळोदे

प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोध हे अत्यंत गंभीर व चिंतनशील लेखक आहेत. कवी, कादंबरीकार आणि टीकाकार म्हणून त्यांचे कार्य श्रेष्ठ दर्जाचे ठरले आहे. मुक्तिबोधांनी 'काही निबंध' (१९६२) आणि 'सृष्टी', 'सौंदर्य' आणि साहित्यमूल्य' (१९५८) हे महत्त्वपूर्ण समीक्षाग्रंथ लिहिले आहेत. 'सृष्टी, 'सौंदय' आणि साहित्यमूल्य' या समीक्षा-ग्रंथाला साहित्य अकादमी पुरस्कार लाभला आहे. याशिवाय मुक्तिबोधांनी 'नवी मळवाट' कवितासंग्रहाच्या पहिल्या आवृत्तीला (१९४९) व दुसऱ्या आवृत्तीला (१९६४) चिंतनपर प्रस्तावना लिहिल्या आहेत. या प्रस्तावनांमधून मुक्तिबोधांनी नवकाव्याविषयी आपली भूमिका व चिंतन मांडले आहे. दुसऱ्या आवृत्तीच्या दीर्घ प्रस्तावनेतून त्यांनी मर्ढेकरोत्तर नवकवितेच्या स्वरूपाचे मर्मग्राही विश्लेषण केले आहे; तसेच स्वत:च्या कवितेचे अंतरंगही उलगडून दाखविले आहे. 'नवी मळवाट' कवितासंग्रहाच्या दोन्ही आवृत्तींच्या प्रस्तावनांमधून नवकाव्यविषयक जे चिंतन मांडले त्याचा वेध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखात केलेला आहे.

'नवी मळवाट'च्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेचे शीर्षक आहे : 'थोडे नवकाव्यासंबंधी'. मर्ढेकरी कवितेच्या उदयानंतर नवकाव्याची चर्चा मराठी समीक्षेत होत होती. मात्र त्यावेळी नवकाव्याचे स्वागत कमी आणि टीकाच अधिक होत होती. प्र.के. अत्रे, पु.ल. देशपांडे यांच्यासारखे प्रख्यात लेखक नवकाव्याची चेष्टा करीत होते. अशावेळी मुक्तिबोधांनी नवकाव्यासंबंधी आपली भूमिका पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत मांडली आहे.

रचनेतील तऱ्हेवाईकपणा, विचित्र शब्दांची योजना म्हणजे नवकाव्य अशी काहींनी समजूत करून घेतली होती. मुक्तिबोधांनी हे गैरसमज दूर करण्यासाठी, नवकाव्याचे खरे स्वरूप विशद करण्यासाठी ही प्रस्तावना लिहिली आहे. नवकाव्याच्या आकलनासाठी नवकाव्यातील दुर्बोधता, प्रतिमासृष्टी, महायुद्धोत्तर स्वातंत्र्योत्तर भारतीय समाजाचे गंभीर भावविश्व या गोष्टी समजून घ्याव्या लागतील असे मुक्तिबोध म्हणतात. नवकाव्यात प्रगट झालेली नवता ही रचनेतील नसून आशयाच्या नवेपणातून आली आहे, हे त्यांनी स्पष्ट केले आहे. काव्यातील आशय हा समाजजीवनातून येतो. या समाजजीवनावर त्यांनी मार्क्सवादी दृष्टिकोनातून भाष्य केले आहे.

स्वातंत्र्योत्तर भारतीय समाजात विराट विपन्नावस्थेमुळे एक प्रकारची सर्वपक्षी निराशा व विफलता आली होती. भांडवलशहा व सरंजामदार यांची युती होऊन बहुजनसमाजाची पिळवणूक सुरू असताना भांडवलशहांना देशभक्त मानले जात होते. भांडवलशाहीच्या शोषणाचे विदारक सत्य मान्य करावयाची पांढरपेशा मध्यमवर्गाची तयारी नव्हती. त्यामुळेच मध्यमवर्गाला विफलता आली होती. अशावेळी मध्यमवर्ग व श्रमिकवर्ग एकत्र येऊन भांडवलशाहीच्या विरुद्ध एकत्र लढा देतील असा मुक्तिबोधांचा आशावाद होता. नवकाव्य लिहिणारे प्रामुख्याने मध्यमवर्गीय कवी आहेत हे निरीक्षण मुक्तिबोधांनी नोंदविले. नवकाव्यात दोन प्रवाह आहेत. नैराश्यवादी आणि आशावादी. नैराश्यवादी प्रवाहाचे नेतृत्व मर्ढेकरांकडे आहे. या नैराश्यवादी मर्ढेकरी कवितेवर मुक्तिबोधांनी कठोर टीका केली. दुसऱ्या महायुद्धानंतर भारतातही समाजसंबंध बदलले होते. युरोपचा विध्वंस झाला होता. यंत्रयुगाने बदललेले मानवी जीवन या गोष्टींचा परिणाम नवकवींवर झाला होता. या यंत्रयुगाची फक्त नकारात्मक बाजू मर्ढेकरांनी मांडली आहे. अशी टीका मुक्तिबोधांनी केली आहे. ते म्हणतात, '.....सर्वनाश बौद्धिक आणि यांत्रिक प्रगतीनेच झाला आहे अशी समजूत करून घेऊन अबुध्दिवादी आणि प्रगतिविरोधी विचारांचा एक वर्ग नवकवींत निर्माण झालेला आहे'.[१]

मर्ढेकरांनी वास्तव जीवनाचे दर्शन घडविताना जे नैराश्याचे दर्शन घडविले त्यविरुद्ध आपली बाजू मुक्तिबोधांनी पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत मांडली आहे. बाह्य सामाजिक जीवनातील अराजक, विसंगती, विद्रूपता, मानवी मूल्यांची हत्या, एक विराट यंत्रव्यवस्थेत उपकरण मात्र ठरलेला मानव- हे सामाजिक वास्तव नवकाव्यात मांडल्या गेले आहे. मुक्तिबोध मात्र आजच्या सामाजिक अवस्थेमुळे झालेल्या स्वप्नभंगावर थांबायला तयार नाहीत. त्याच्या मते 'उद्याचा आशावाद' हेही नवकाव्याचे वैशिष्ट्य आहे. मुक्तिबोध म्हणतात, 'आजचे वास्तव, आजच्या जीवनाचे उद्याचे वास्तव हीच नवकवितेची आधारशिला होय'.[१]

पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत मुक्तिबोधांचा रोष मर्ढेकरी कवितेच्या आशयावर आहे. मर्ढेकरांनी महायुद्धोत्तर मूल्यऱ्हासाचे नैराश्यजनक दर्शन घडविले त्यावर मुक्तिबोध टीका करतात. त्यांच्या मते मृतप्राय वर्गातील कीड साऱ्या मानवजातीचा गुणविशेष समजून साऱ्या मूल्यांचा उपहास करण्याची प्रवृत्ती चुकीची आहे. यंत्राचा माणूस दास झाला हे खरे नसून यंत्राच्या मालकांनी (भांडवलदारांनी) समाजाला दास केले आहे. सामाजिक विषमतेसाठी भांडवलशाही जबाबदार आहे. यंत्रांची (उत्पादन साधनांची) वैयक्तिक मालकी जाऊन सामुदायिक मालकी आली की आजची दैन्यावस्था संपेल असा मुक्तिबोधांचा आशावाद होता.

मुक्तिबोधांनी नवकाव्यातील दोन प्रवाहाचा उल्लेख केला आहे. एक मर्ढेकरांचा नैराश्यवादी- तुच्छतावादी; तर दुसरा समाजवादी तत्त्वज्ञानावर आधारलेला, आशावादी प्रवाह. हा आशावादी प्रवाहच नवकाव्यातील प्रमुख प्रवाह असल्याचे पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत मुक्तिबोधांनी प्रतिपादन केले आहे. नवकाव्यातील नैराश्यवादी आणि आशावादी विचारधारेची तुलना मुक्तिबोधांनी पुढीलप्रमाणे केली आहे.- 'एक व्यक्तिवादी, अहंवादी तर दुसरी समाजवादी मानवतावादी. एक निराशामूलक तर दुसरी दृढ आशेवर फोफावणारी. एकीची त्रयस्थाची उपहासात्मक भूमिका तर दुसरीची सहप्रवाशाची समदु:खी अशी भूमिका''[३] या दोन्ही विचारधारांमध्ये अत्याधुनिक कवितेची लक्षणे प्रगट झाली आहेत हे मुक्तिबोध मान्य करतात.

'नवी मळवाट'च्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत कवी अनिल यांना नवकाव्याच्या जनकत्वाचा मान देण्यात आला आहे. कवी अनिल यांनी मुक्तछंदाचा आविष्कार करून चिंतनशील काव्य लिहिल्याचे मुक्तिबोध सांगतात, पण नवकाव्याला खरा बहर पुढच्या काळात आल्याचे सांगून या आशावादी प्रवाहाचे नेतृत्व स्वत:कडे असल्याचे त्यांनी सूचित केले आहे. नवकाव्याच्या आशावादी प्रवाहाचे त्यांनी 'पुरोगामी

नवकाव्य' असे नामकरण केले. मुक्तिबोध म्हणतात, पुरोगामी नवकाव्य नुसते सामाजिक परिस्थितीचे चित्रण करू पाहत नाही, तर त्या समग्र सामाजिक परिस्थितीवर आरूढ होऊन तीस बदलू पाहते. सामाजिक परिवर्तन हे नवकाव्याचे प्रमुख ध्येय असल्याचे मुक्तिबोधांनी सांगितले आहे. त्यांच्या दृष्टिकोनातील नवकाव्य रसिकांच्या मनात प्रक्षोभ निर्माण करणारे आहे. 'वितृष्णा आणि प्रक्षोभ' हेच आजचे 'युगतत्त्व' असल्याचे ते म्हणतात. नवकवितेतील प्रतिमांना केवळ अलंकरण मूल्य नसून प्रतिमांच्या द्वारा अनुभूतीची पीडा तीव्रतेने प्रगट झाली पाहिजे, हा प्रतिमासंबंधीचा मुक्तिबोधांचा दृष्टिकोन आहे. थोडक्यात, नवकाव्यातील प्रतिमांचे महत्त्व सामाजिक आशयाचे प्रगटीकरण करण्याच्या दृष्टीने आहे. नवकाव्याची बैठक बौद्धिक असल्यामुळे नवकाव्याच्या अभिव्यक्तीसाठी मुक्तछंदाचा पुरस्कार मुक्तिबोधांनी केला आहे, इतकेच नाही तर मुक्तछंद नवकाव्याचे स्वाभाविक अंग असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

नवकाव्याची पुढील ठळक वैशिष्ट्ये मुक्तिबोधांनी सांगितली आहेत.- समाजप्रवण, समाजास बदलू पाहणारी वैचारिक बैठक, प्रतिमांचा उपयोग केवळ अलंकरणासाठी न करता आजच्या आणि उद्याच्या वास्तवतेचे वर्णन करण्यासाठी करणे आणि नवछंद ही ती वैशिष्ट्ये होत. नवकाव्यातील निराशामूलक तुच्छतावादी वृत्तीला (एक प्रकारे मर्ढेकरी काव्यविशेषांना) मुक्तिबोधांनी विध्वंसक मानले आहे. साऱ्या पीडित मानवजातीसंबंधी खरीखुरी गंभीर सहानुभूती हा पुरोगामी नवकवितेचा आधार असल्याचे मुक्तिबोध म्हणतात. नवकाव्यातील रचनेचे प्रयोग हे साधन असून साध्य नाही याची जाणीवही नवकवींना असल्याचे ते सांगतात. १९४९ च्या 'नवी मळवाट' च्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत त्यांनी नवकाव्यासंबंधी वरील भूमिका मांडली आहे.

'नवी मळवाट' कवितासंग्रहाची दुसरी आवृत्ती १९६४ साली मौर्ज प्रकाशनाने प्रसिद्ध केली. या आवृत्तीला मुक्तिबोधांनी ४२ पृष्ठांची दीर्घ चिंतनपर प्रस्तावना लिहिली आहे. या प्रस्तावनेत त्यांनी पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेवरही भाष्य केले आहे. पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत, नैराश्यवादी-तुच्छतावादी मर्ढेकरी प्रवाहापेक्षा आशावादी प्रवाहच नवकाव्यातील प्रमुख प्रवाह ठरेल असे भाकित केले होते. दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत त्यांनी मर्ढेकरांची अभिव्यक्ती विलक्षण परंपराच प्रमुख ठरली असे म्हटले आहे. पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत मर्ढेकरांवर टीका करणाऱ्या मुक्तिबोधांनी दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत आपल्या भूमिकेत बराच बदल केला आहे.

पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत मर्ढेकरांवर कमालीची प्रतिकूल टीका करणारे मुक्तिबोध मर्ढेकरासंबंधी लिहितात, 'मर्ढेकरांची सहानुभूती थोर होती, ते निराशावादी

कवी असले तरी केशवसुतांइतकेच मानवनिष्ठ होते. केशवसुत आशावादी-मानवतावादी तर मर्ढेकर निराश मानवतावादी'' पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत त्यांनी नवकाव्याचे जनकत्व कवी अनिल यांच्याकडे दिले होते. दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत कवी अनिलांसंबंधी मुक्तिबोध लिहितात, 'त्यांची ही काव्ये निव्वळ बौद्धिक सहानुभूती दर्शविणारी होती. त्यांत सखोल अनुभवाचा अभाव होता....'

आपल्या चुकलेल्या भाकिताविषयी मुक्तिबोध लिहितात, 'स्वातंत्र्योत्तर काळातील संक्रमणावस्थेत आजवर अप्रकट राहिलेल्या सर्व विसंगती डोके वर काढतील व मानवी स्वातंत्र्याच्या समतेचा संघर्ष भारतात सर्वव्यापी बनून समाजवादी निष्ठाही कवींच्या प्रत्यक्ष प्रचीतीची व त्यांच्या समग्र व्यक्तित्वाला नैतिक आवाहन देणारी जाणीव ठरेल, असा माझा विश्वास होता. हे भविष्य चुकले व भारतीय समाजाने नव्या वळणाने वाटचाल केली'.` पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत मर्ढेकरांच्या कवितेला नैराश्यवादी, तुच्छतावादी, अबुद्धिवादी म्हणणारे मुक्तिबोध दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत केशवसुतानंतर नवकवितेचे नेतृत्त्व मर्ढेकरांनी केले असे ते सांगत आहे. मर्ढेकरांची कविता नैराश्यवादी, व्यक्तिकेंद्रित आहे असे ते दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेतही म्हणत आहेत. परंतु स्वातंत्र्योत्तर नवकवितेची परंपरा जी पुढे गेली तिचे नेतृत्व मर्ढेकरांनीच केले. (कवी अनिल यांनी नाही) असेही ते स्पष्टपणे सांगत आहेत. 'केशवसुतांच्या व्यक्तिस्वातंत्र्याधिष्ठित मानवतावादाची क्रांतिकारकता ओसरून मर्ढेकरांच्या व्यक्तिवादी मानवतावादाची कविता पुढे आली..... भांडवलशाहीने व साम्राज्यवादाने पुढे स्वतःचे विध्वंसक रूप प्रकट केले. या सर्व प्रकाराकडे अगतिक परंतु अंतर्भेदी दृष्टीने पाहणारे, मानवी सामर्थ्याबद्दल निराश झालेले कवी मर्ढेकर. मराठी मध्यमवर्गाच्या एका ऐतिहासिक अवस्थेतील जाणिवेतून मानवी जीवनाच्या एका बाजूचा तलस्पर्शी वेध घेणारे काव्य म्हणजे मर्ढेकरांचे काव्य. मर्ढेकरांच्या निराश, परंतु उत्कट माणुसकीचा संबंध एकीकडे जसा केशवसुतापर्यंत पोचतो तसेच काव्यातील अबुद्धिवादामुळे व अभिव्यक्ती विलक्षणतेमुळे त्यांचे काव्य आजकालच्या प्रयोगवादी, सौंदर्यवादी काव्याचा उगमस्थानी आहे'.` नवकाव्याची परंपरा मर्ढेकरांच्या वाटेने पुढे गेली. मर्ढेकरांच्या अश्रद्ध व्यक्तित्वाकडून पुढच्या काळातील नवकवींनी सौंदर्याचे तत्त्व आत्मसात केले. व्यक्तिनिष्ठा व अभिव्यक्ती विलक्षणता या वैशिष्ट्यांना नवकवितेत मध्यवर्ती स्थान मिळाले. ही वैशिष्ट्ये असणाऱ्या नवकवितेच्या परंपरेला विशेष महत्त्व आल्याचे मुक्तिबोध सांगतात. मर्ढेकरी परंपरेतील या नवकवितेच्या आशयात कमालीची व्यक्तिकेंद्रितता असल्याचे निरीक्षण मुक्तिबोधांनी नोंदविले आहे. 'मर्ढेकरांनी मानवी

जीवनातील दुहेरीपणा ज्या मूलभूत अस्तित्ववादी (Existentialist) जाणिवेतून दाखविला होता त्यामधील दंभस्फोटात्मक प्रवृत्तीच तेवढी या परंपरेतील कवीने कधीमधी घेतली.' असे ते म्हणतात.

मर्ढेकरोत्तर नवकवितेची पुढील वैशिष्ट्ये मुक्तिबोधांनी सांगितली आहेत

१) **प्रयोगशीलता :** मर्ढेकरांनी केलेल्या प्रयोगामागे एक विशिष्ट उद्दिष्ट होते- त्या प्रयोगाद्वारे त्यांना विवक्षित आशय व्यक्त करावयाचा होता, परंतु मर्ढेकरोत्तर नवकवितेचे प्रमुख वैशिष्ट्य नित्य नवे प्रयोग करीत राहणे हेच आहे. या संदर्भात मुक्तिबोधांनी पु.शि. रेगे, विंदा करंदीकर, दिलीप चित्रे, अरुण कोलटकर या कवींचा उल्लेख केला आहे.

२) **प्रतिमाप्रधानता :** प्रतिमाप्रधानता हे वैशिष्ट्य मर्ढेकरांच्या पासूनच असले तरी मर्ढेकरोत्तर नवकवितेमध्ये प्रतिमा या केवळ साधन नाहीत. प्रतिमा व प्रतिमाबंधाला मर्ढेकरोत्तर नवकवितेमध्ये मध्यवर्ती स्थान प्राप्त झाले आहे. या कवितेमधून प्रतिभानुभव व्यक्त होतो.

३) **अमूर्तता :** मर्ढेकरोत्तर नवकविता जीवनदर्शनात्मक व जीवनसंदर्भमूलक नाही. ऐंद्रिय प्रतीतिप्रधान, संदर्भरहितता, व्यक्तिमनोवस्था व शरीरसंवेदना यांनाच महत्त्व देत असल्यामुळे अमूर्तता हे मर्ढेकरोत्तर नवकवितेचे एक प्रमुख वैशिष्ट्य ठरले आहे.

४) **रूपसौंदर्यवाद :** मर्ढेकरोत्तर नवकविता रूपसौंदर्याला महत्त्व देणारी आहे. लौकिक जीवनातील ऐंद्रिय व आल्हादक संवदेनामधून ही कविता कलात्मक रचनाबंध निर्माण करते. हा रूपसौंदयवाद मुख्यत्वे पु.शि. रेगे, इंदिरा संत, बोरकर, बापट, पाडगावकर, कांत इत्यादी कवींमध्ये आढळून येतो. या रीतीवादी सौंदर्यवादाचे प्रवर्तक मर्ढेकर असल्याचे मुक्तिबोध सांगतात. ही परंपरा आशयवादी नसून अभिव्यक्ती प्रधान आहे. केशवसुत- बालकवींनी कवितेत केलेली क्रांती ही जीवनदृष्टीच्या व आशयाच्या बाबतीत होती. मर्ढेकरी कवितेतील क्रांती ही अभिव्यक्तीतील क्रांती आहे. मुक्तिबोध म्हणतात, 'चालू काव्यातील परिवर्तन हे अभिव्यक्तीच्या टोकाकडून झालेले आहे. कवीचा प्रत्यय मुख्यत: अभिव्यक्तीचा प्रत्यय आहे व त्यांच्या प्रज्ञेची सूक्ष्मता ही अभिव्यक्तीच्या अंगाने प्रगट होत आहे.'

एकोणविसाव्या शतकातील वर्ले, रिंबो, मेलार्मे या कवींनी व्यावहारिक, स्वार्थकेंद्रित मध्यमवर्गीय जाणिवांच्या विरुद्ध बंड केले व संवेदननिष्ठ काव्य लिहिले. मध्यमवर्गाने संवेदना नाकारल्या म्हणून या फ्रेंच कवींनी संवेदनांना मध्यवर्ती स्थान दिले. मध्यमवर्गीय समाजातील निष्फळ नीरस बुद्धिवादाविरुद्ध ठाम भूमिका रैंबो, मेलार्मे या

कवींनी घेतली. खोटा प्रतिष्ठितपणा व आत्मप्रतारणा यांच्याविरुद्ध बंड करून शारीर-मानस अनुभूतींना वर्जनारहित मध्यवर्ती स्थान दिले. स्वसंवेदनेतून जीवनाच्या सारसत्याचा (essence) प्रत्यक्षानुभव देणारे काव्य तेच खरे काव्य अशी गूढवादी भूमिका या फ्रेंच कवींनी घेतली. मुक्तिबोध म्हणतात, या एकोणिसाव्या शतकातील संवेदनानिष्ठ फ्रेंच कवींची बंडखोरी आणि अभिव्यक्ती वैशिष्ट्ये मर्ढेकरोत्तर नवकवींनी आत्मसात करण्याचा प्रयत्न केला. फ्रेंच कवी आणि मर्ढेकरोत्तर नवकवी यांच्यातील भेद सांगताना मुक्तिबोध म्हणतात, वर्ले, रिंबो, मेलार्मे या फ्रेंच कवींनी प्रत्यक्ष बंडखोरी केली तर मर्ढेकरोत्तर नवकवींना सांगण्यासारखे काहीच विशेष न उरल्यामुळे त्यांची वाटचाल अभिव्यक्ती वादाच्या दिशेने झाली व त्यातूनच मर्ढेकरोत्तर नवकवींचे वैशिष्ट्यपूर्ण काव्य निर्माण झाले आहे.

मर्ढेकरांनी पुढे आणलेल्या आकृतिवादातून आणि यांत्रिक सौंदर्यविचारातून जी मर्ढेकरोत्तर नवकविता जन्माला आली ती मर्ढेकरांच्या उदंड मानवतेला विसरली असल्याचे मुक्तिबोध सांगतात.

मर्ढेकरोत्तर नवकवितेचा विचार करताना करंदीकरांपेक्षा चित्रे-कोलटकरांचा काव्यानुभव मुक्तिबोधांना अधिक वास्तविक आणि अंतर्गत दाबातून निर्माण झालेला वाटतो. चित्रे-कोलटकर हे कवी स्वत:च्या अनुभवाच्या डोहात खोलवर शिरू शकतात. त्यामुळे हे दोन कवी प्रतीकवादी युरोपीय कवींच्या जवळपास जाऊ शकतात असे मुक्तिबोधांना वाटते. (मुक्तिबोधांनी मार्क्सवादी जाणिवेचे कवी नारायण सुर्वे यांचा या प्रस्तावनांमध्ये कुठेही उल्लेख केला नाही हे आश्चर्यकारक आहे.)

मुक्तिबोधांनी मर्ढेकरोत्तर नवकाव्याच्या मर्यादा आणि सामर्थ्यस्थळे एकाचवेळी सांगितली आहेत. मुक्तिबोध म्हणतात, 'सूक्ष्मता, सूचकता व अभिव्यक्तीच्या अंगाचे अनेक गुण यादृष्टीने मराठी काव्य विकसित झाले असे नि:संशय म्हणता येईल... असे वाटते.'

'नवी मळवाट' कविता संग्रहाच्या पहिल्या व दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावना गंभीर व चिंतनपर आहेत. यांमधून मुक्तिबोधांच्या भूमिकेत झालेला बदल पाहावयास मिळतो. मुक्तिबोध हे दुराग्रही समीक्षक नसून सत्यनिष्ठ समीक्षक आहे याची प्रचीती या प्रस्तावनांतून येते. नवकवितेचा प्रवाह आशयवादी- आशावादी अंगाने पुढे गेली नाही, तो अभिव्यक्तीच्या अंगाने पुढे गेला हे सत्य मांडायला मुक्तिबोध कचरले नाहीत. इतकेच नाही तर नवकवितेचे जनक आणि नेतृत्वही मर्ढेकरांनीच केले आहे हे त्यांनी दुसऱ्या

आवृत्तीच्या प्रस्तावनेत स्पष्टपणे सांगितले. नवकवितेवर भाष्य करतांना मुक्तिबोध आपल्या सत्यनिष्ठ भूमिकेपासून किंचितही ढळले नाही हे गौरवास्पद आहे.

मोबा. ९७६३३२५३८८

संदर्भ :

१) शरच्चंद्र मुक्तिबोध, 'नवी मळवाट', (परिशिष्ट : पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना) मौज प्रकाशन, मुंबई, ति.आ. १९८७, पृ. ९९

२) तत्रैव, (परिशिष्ट : पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना) पृ. १००

३) तत्रैव, (परिशिष्ट : पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना ) पृ. १०२

४) तत्रैव, (दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना) पृ. १०

५) तत्रैव, (दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना) पृ. १०

६) तत्रैव, (दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना, पृ, २२-२३